॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने परीक्षेबाबत अधिक जनजागृती व्हावी व कॉपीचे समूळ उच्चाटन व्हावे यासाठी विविध घटकांना सोबत घेवून बैठकांचे आयोजन केले आहे.

दि. १२ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता विधी महाविद्यालयांचे प्राचार्य, विधी महाविद्यालयांच्या व्यवस्थापन मंडळाचे प्रत्येकी एक प्रतिनिधी, विधी महाविद्यालयातील प्रत्येकी एक शिक्षक आणि मानव्यविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता यांच्या समवेत बैठक होणार आहेत. दि. १७ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता सिनेट सभागृहात सिनेट सदस्य आणि विविध विद्यार्थी संघटनांचे प्रत्येकी दोन पदाधिकारी यांच्या समवेत बैठक होणार आहे. दि. १८ ऑक्टोबर रोजी दुपारी २:३० वाजता महाविद्यालये/परिसंस्था/प्रशाळा यामधील परीक्षेशी संबंधित कामकाज पाहणारा प्रत्येकी एक कर्मचारी व प्रवेश प्रक्रिया तथा एमकेसीएल कार्यप्रणालीचे कामकाज पाहणारे एक कर्मचारी आणि विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांची बैठक होणार आहे. या तीन ही बैठकांना कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक आणि विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा प्रक्रियेशी संबंधित, निकालाची कार्यपध्दती, त्यातील तांत्रिक अडचणी, कॉपीचे समूळ उच्चाटन, परीक्षा दरम्यान विद्यार्थ्यांनी कॉपी किंवा गैरप्रकार केल्यास होणा-या संभाव्य शिक्षा या संदर्भातील माहिती व जागृती होण्याच्या दृष्टीने या बैठका होणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी दिली.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्त कक्ष आणि व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने सोलर -पीव्ही टेक्नालॉजी या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

मिटकॉन कन्सलटन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लि. संभाजीनगर येथील विश्वनाथ दामोदर, डॉ. जयदीप साळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेचे ४८ विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले होते. विश्वनाथ दामोदर यांनी सोलर –पीव्ही तंत्रज्ञानातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण केल्यास स्व:तचा व्यवसाय करता येईल असे सांगितले. डॉ. साळी यांनी अपारंपरिक सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांचा वापर करण्याची गरज असल्याचे सांगितले. प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे, कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार यावेळी उपस्थित होते. विवेक सैंदाणे यांनी प्रास्ताविक केले.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव दि. ६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गांधी अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने प्रताप तत्वज्ञान केंद्र अमळनेर येथे गांधी विचार शिबीर घेण्यात आले.

प्रा. नितीन पाटील यांनी गांधी विचारांचे महत्व आपल्या व्याख्यानात विशद केले. अध्यक्षस्थानी विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. म. सु. पगारे होते. प्रास्ताविक समन्वयक डॉ. उमेश गोगडिया यांनी केले. अधिसभा सदस्य प्रा. संदीप नेरकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. दिलीप गिरे हे उपस्थित होते. प्रा. हेमंत पवार यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. प्रा. भाग्यश्री जाधव यांनी आभार मानले.

.....................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ६ ऑक्टोबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी